Thursday, the 5 February, 2026

Regulation No. 03/2026

"आधुनिक व्यायामशाळेचे सदस्यत्व स्वीकारण्याबाबतचे सुधारणा विनियम-२०२६"

ज्याअर्थी, "आधुनिक व्यायामशाळेचे सदस्यत्व स्वीकारण्याबाबतचे विनियम क्र.७/२०२३" (यापुढे "मुळ विनियम" म्हणून संबोधण्यात येईल) हे विद्यापीठाने राजपत्राद्वारे पुर्वीच प्रकाशित केले आहेत;

आणि

ज्याअर्थी, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाने विषय क्र.५८, दिनांक ०१/०८.२०२५ अन्वये आधुनिक व्यायामशाळेच्या सदस्यत्व शुल्कात वाढ करण्याची शिफारस केली आहे;

आणि

ज्याअर्थी, वरील शिफारशी अन्वये मुळ विनियमांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (कलम ३१(फ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे "आधुनिक व्यायामशाळेचे सदस्यत्व स्वीकारण्याबाबतचे सुधारणा विनियम-२०२५" हे विनियम मंजूर केले आहेत.

१. सुधारणा (Amendment)

मुळ विनियम क्र.७/२०२३ मधील कलम १ (a) मध्ये नमूद केलेल्या शुल्कांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

(a) मासिक शुल्क (Monthly Membership Fee)

संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यापीठ पद्व्युत्तर विभागाचे विद्यार्थी, शिक्षक, विद्यापीठ आस्थापनेवरील कायम कर्मचारी आणि विविध प्राधिकरणी मंडळ सदस्य ह्यांचे रूपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त) ऐवजी रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त) असे मासिक शुल्क निर्धारित करण्यात येत आहे.

(b) सर्वसामान्य सदस्य (General Members)

सर्वसामान्य सदस्यांकरिता रुपये ८००/- (अक्षरी रुपये आठशे फक्त) ऐवजी ६००/- (अक्षरी रुपये सहाशे फक्त) असे शुल्क निर्धारित करण्यात येत आहे.

वरील दुरुस्तीमुळे मुळ विनियमातील संबंधित तरतुदी येथे नमूद केलेल्या सुधारित शुल्कांनुसार वाचण्यात येतील.

*****